जा.क्र./प्रा /प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ याचे कार्यालय.
दिनांक :-
27 APR 1995

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद – पुणे-३३

विषय :- सन १९९3- ९४ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस १०९४/(५४५०) प्राशि-3 दिनांक १७.८.९४ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९ 3 पासून इयत्ता १ ली ते सन १९९ 3 - ४ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्त्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदानतत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| मंगळुरा कॅथॉलिक असोसिएशन काळेवाडी, पुणे. | बेथानी निर्मल इंग्लिश मिडीयम स्कूल, काळेवाडी, पुणे 33 | जुन १९९३ पासून इ.१ ली ते आठ मध्ये प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस | इंग्रजी. |

२.१ सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.
२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.
२.३ शाळेत शासनाने वेळो वेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विर्द्वक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळो वेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरूपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा-व्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज ~~सक्षम~~ सक्षम क्षेत्रिय अधिकाऱ्याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहिल अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था , संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपांच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [ यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा. ]

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

[signature]
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१. [handwritten initials]

प्रत :-

प्रशासन अधिकारी /महानगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ पिंपरी
जिल्हा ________ यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :-

मा. सचिव,
द मल्हारा कॅथॉलिक असोसिएशन काळेवाडी पुणे ३३
________ यांना माहितीसाठी अग्रेषित.

शिदे/२६४९५.

[redacted]
कायम विनाअनुदान तत्वावर

जा.क्र प्राशि/खाप्राशा/वर्ग-तुकडा/मंजुरी/पुवि/०१. 26622/2
शिक्षण उपसंचालक, 22
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 13 DEC 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.
३. प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/[redacted] शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड, पुणे-१८.

विषय : मान्यताप्राप्त [redacted] कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळेस सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षी [redacted]/अतिरिक्त [redacted] वाढीच्या [redacted] तुकडया मंजूर करणेबाबत.

संदर्भ : प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्र.खाप्राशा/२०००/तुमा-२/६०७३२/इ. ५१२, दिनांक २९.११.२००१

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त शाळेच्या प्रस्तावाचा विचार करता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या [redacted]/अतिरिक्त [redacted] वाढीच्या [redacted]/तुकडया [redacted] कायम विनाअनुदान तत्वावर जून, २००० पासून सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत [redacted] आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ. नैसर्गिक/अतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | निर्मल बेनजी हायस्कूल, पिंपरी, काळेवाडी, जि. पुणे. | इंग्रजी | इ. १ ली ते ३ री ची दुसरी तुकडी | अतिरिक्त |

अटी व शर्ती.

१. ज्या शाळांना जून, २००० पासून विनाअनुदान तत्वावर वर्ग/तुकडया मंजूरी देण्यात आलेली आहे या वर्ग/तुकडया भविष्यात जून, २००४ पासून अनुदानास पात्र ठरविताना शासन निर्णय क्रमांक-पीएलएस-१०००/(२४५५)/प्राशि-१, दिनांक ८.११.२००० मधील अटी व निकषांचा अवलंब करावा व अनुदानास पात्र ठरणा-या या वर्गाला/तुकडयांना आवश्यक असणारी आर्थिक तरतूदीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे त्यावर्षी उपलब्ध करुन घेण्याची दक्षता संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद/शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांनी घ्यावी.
२. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेने वर्ग/तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन घ्याव्यात.
४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सुविधा चांगली असणे आवश्यक आहे.
५. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अमलबजावणी केली पाहिजे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या वर्ग/तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील पट व उपस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
७. सदर शाळेच्या मंजूर करण्यात आलेल्या या वर्ग/तुकडीत विद्यार्थी संख्या कायम पुरेशी असणे आवश्यक आहे.
८. तपासणी अंती एक जरी अट अथवा शर्त नियमबाह्य निदर्शनास आल्यास वर्ग/तुकडी मंजूरी रद्द करण्यात येईल.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका, निर्मल बेनजी हायस्कूल, पिंपरी, काळेवाडी, जि. पुणे.

५२२९३।१४

जा.क्र.प्रा.प्राशि/खाप्राशा/तु.मा./पुवि/०२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 2 7 NOV 2002

प्रति,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

३. प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड

**विषय :** विनाअनुदानित/कायम विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना सन २००१-०२ या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वाढ/अतिरिक्त तुकडी वर्ग मंजूर करण्याबाबत,

**संदर्भ :** मा. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील खाप्राशा/०२/तु.मा./६०७३३/ड-५१२, दि. १२.११.२००२ चे पत्र.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना वर्ग/तुकडया सन २००१-०२ या वर्षापासून *कायम विना अनुदान तत्वावर* व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही तसेच भविष्यात अनुदानाची मागणी करणार नाही व 'सदरचे वर्ग प्रत्यक्षात सुरु असतील' या अटीवर संदर्भाधीन पत्रान्वये परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | निर्मल बेथनी हायस्कूल, पिंपरी काळेवाडी जि. पुणे. | इंग्रजी | म. न. पा. | ४थी चा प्रथम वर्ग व २री तुकडी इ. ५ वी व ६ वी चा प्रथम वर्ग | मंजूर |

सदर प्राथमिक शाळांना वर्ग/तुकड्यांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

१. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

यांचेकडे संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दि. - 1 JUN 2006

प्रति,

१] प्रशासन अधिकारी
१] शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे [illegible]

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,
[illegible] - विमाननगर पुणे १८

३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय :- मान्यतेनुसार अनुदानित/विनाअनुदानित व कायम विनाअनुदानीत खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत.......

[illegible] प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/ जादा तुकडीस जून १९९५ पासून ~~अनुदान/विना अनुदान~~/कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस.वाढ | शेरा/मंजूर. |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १) | निर्मल कॉन्व्हेंट इंग्लिश मिडियम स्कूल कॅलवडि पुणे | इंग्रजी | ६वी | १ तुकडी नैसर्गिक | मंजूर |

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
निर्मल कॉन्व्हेंट इंग्लिश
मिडियम स्कूल कॅलवडि
पुणे

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
दिनांक – ३० ९ /२००४.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
निर्मल कोस्मती,
इंग्लिश मीडि. स्कूल
काळेवाडी.

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत. [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक व्हीसलसस/१००२/[१०००/०२] /प्राशि–३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. ५/९/०४ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्ताच्या ~~नैसर्गिक~~ / अतिरिक्त तुकडया वर्गांना २००३ – २००४ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक या अतिरिक्त | विनाअनुदानित / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| | निर्मल कोस्मती इंग्लिश मीडि. स्कूल काळेवाडी | इंग्रजी | इ. ५वीते इ.८वी | ५ अतिरिक्त | प्रत्येकी [illegible] |

शाळेने स्वरुप वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणी व सेवा शर्तींच्या [illegible]

२] सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

**<u>कायम विना अनुदान तत्वावर</u>**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/१२६५/२०१३.
दिनांक :- ११/१२/२०१३

प्रति,

**मुख्याध्यापिका,**
निर्मल बेथनी इंग्लिश मेडियम स्कुल
जियनगर, काळेवाडी

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ१) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त /नैसर्गिक वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| निर्मल बेथनी इंग्लिश मेडियम स्कुल<br>विजयनगर, काळेवाडी | इंग्रजी | अतिरिक्त | इ. ४ थी ते इ. ७ वीच्या प्रत्येकी तिसऱ्या तुकडीस |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).

२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.

३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.

५) सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

७) आर.टी.ई २००९ चे नियमांचे पालन करणेत यावे.

11/12/2013

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

प्रतः- माहितीसाठी- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/१७
पुणे, दि. १७/६/९७.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~निर्मल बेथानी हायस्कूल, काळेवाडी~~
~~पुणे १७~~

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९७-९८, इ. ~~६ वी, ७वी, ९वी~~, १०वी.

आपल्या दि मालनकर कॅथॉलिक असोसिएशन द्वारा संचालित निर्मल बेथानी हाय काळेवाडी या माध्यमिक शाळेतील इ.८वी/~~५ वी~~ चे वर्गास ( माध्यम ~~मराठी~~/इंग्रजी ) सन १९९५ - ९६ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य २(७)/नमाशा/मान्यता/पुवि/९५ दि.३१/५/९६ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९७ - ९८ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी, ७ वी, ९ वी~~, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे/ ~~गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती~~ यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे भरुन मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे.करिता.